**ठळक बातम्या**

- उपराष्ट्रपतीपदासाठी रालोआचे उमेदवार सी पी राधाकृष्णन यांना एकमताने निवडून देण्याचं प्रधानमंत्र्यांचं आवाहन

- इंडिया आघाडीची उमेदवारी माजी न्यायमूर्ती सुदर्शन रेड्डी यांना जाहीर

- मतदार याद्यांसंदर्भात विरोधकांचा संसदेत गदारोळ / दोन्ही सभागृहांचं कामकाज दोन वाजेपर्यंत तहकूब

- गाझा मधल्या युद्धबंदीच्या नवीन प्रस्तावाला हमासची स्वीकृती

- देशाच्या विविध भागात पावसाचा जोर/ अनेक ठिकाणी पूरसदृश स्थिती

**आणि**

- ज्येष्ठ चरित्र अभिनेता अच्युत पोतदार यांचं निधन

**<><><><><>**

राष्ट्रीय लोकशाही आघाडीच्या संसदीय पक्षाची बैठक आज नवी दिल्ली इथं झाली. या बैठकीत प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी एनडीएचे उपराष्ट्रपतीपदाचे उमेदवार सी. पी. राधाकृष्णन यांचा परिचय करून दिला, आणि त्यांची एकमतानं निवड करण्याचं आवाहन केलं. विरोधी पक्षांनीही राधाकृष्णन यांनाच कौल द्यावा असं आवाहनही त्यांनी केलं.

संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू यांनी बैठकीनंतर माध्यम प्रतिनिधींना ही माहिती दिली. देशाचे उपराष्ट्रपती म्हणून राधाकृष्णन यांची निवड होणं, संपूर्ण देशासाठी आनंदाची बाब असेल, असं ते यावेळी म्हणाले.

**<><><><><>**

उपराष्ट्रपतीपदाच्या आगामी निवडणुकीसाठी इंडी आघाडीकडून सर्वोच्च न्यायालयाचे माजी न्यायाधीश बी. सुदर्शन रेड्डी यांना उमेदवारी देण्यात आली आहे. इंडी आघाडीच्या सर्व घटकपक्षांनी एकमताने रेड्डी यांच्या नावाला संमती दिल्याची माहिती काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांनी आज नवी दिल्लीत इंडी आघाडीच्या घटकपक्षांच्या संयुक्त वार्ताहर परिषदेत दिली. ही निवडणूक विचारधारेची असून राज्यघटना जेव्हा धोक्यात येते, तेव्हा सगळे विरोधी पक्ष एकजुटीने त्याविरोधात उभे राहतात, असंही खर्गे म्हणाले. बी. सुदर्शन रेड्डी यांनी आंध्र प्रदेश उच्च न्यायालयात न्यायाधीश म्हणून, गुवाहाटी उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश म्हणूनही काम केलं आहे.

**<><><><><>**

बिहारमधल्या मतदार याद्या पुनरिक्षणासंदर्भात आणि इतर मुद्यांवर विरोधी पक्षांनी प्रचंड गदारोळ केल्यामुळे आज संसदेच्या दोन्ही सभागृहांच्या कामकाजात व्यत्यय कायम राहिला. राज्यसभेच्या कामकाजाला सुरुवात झाल्यानंतर उपाध्यक्ष हरिवंश यांनी २० स्थगन प्रस्तावाच्या सूचना फेटाळल्याची माहिती सभागृहाला दिली. यानंतर विरोधी पक्षांच्या सदस्यांनी घोषणाबाजीला सुरुवात केली. उपाध्यक्षांनी शून्य प्रहर पुकारला आणि विरोधकांना सभागृह चालू द्यायचं आवाहन केलं. मात्र विरोधकांचा गदारोळ सुरूच राहिल्यानं सभागृहाचं कामकाज दुपारी दोन वाजेपर्यंत तहकूब करण्यात आलं.

लोकसभेच्या कामकाजाच्या सुरुवातीला सभापती ओम बिर्ला यांनी, राज्यघटनेच्या आठव्या अनुसूचीतल्या सगळ्या भाषांमध्ये अनुवाद आणि भाषांतराची सुविधा सभागृहात उपलब्ध झाल्याची घोषणा केली. त्यानंतर विरोधकांची घोषणाबाजी सुरू असतानाच सभापतींनी प्रश्नोत्तराचा तास पुकारला. मात्र, गदारोळ न थांबल्यामुळे लोकसभेचं कामकाज दुपारी १२पर्यंत तहकूब करण्यात आलं. कामकाजाला पुन्हा सुरुवात झाल्यावर विरोधकांची घोषणाबाजी

आणि गदारोळातच विविध कागदपत्रं सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आली. सभापतींनी विरोधकांना सभागृहाचं कामकाज चालू द्यायची आणि जागेवर जाऊन बसायची विनंती केली. मात्र गोंधळ सुरूच राहिल्यानं कामकाज दुपारी दोन वाजेपर्यंत तहकूब करण्यात आलं.

विरोधी पक्षांच्या सदस्यांनी आजही संसदेच्या आवारात निदर्शनं केली.

**<><><><><>**

काँग्रेस नेते राहुल गांधी यांची बिहारमधली ‘मतदार अधिकार यात्रा’ आज नावादा जिल्ह्यात हिसुआ इथं पोहोचली. यावेळी भाजपाच्या कार्यकर्त्यांनी तीव्र निदर्शनं केली. सासाराम इथून सुरु झालेल्या या यात्रेचा आज तिसरा दिवस आहे.

राहुल गांधी आज नवादा इथल्या भगतसिंग चौकात एका जाहीर सभेला संबोधित करणार आहेत. काल संध्याकाळी, गया इथल्या एका सभेत त्यांनी बिहारमधल्या मतदार याद्यांच्या पुनरिक्षण प्रक्रियेवरून भारतीय निवडणूक आयोगावर तीव्र टीका केली.

**<><><><><>**

भारत आणि चीन मधल्या सीमा प्रश्नावर राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोभाल आणि चीनचे परराष्ट्र मंत्री वांग यी यांच्या नेतृत्वाखालच्या विशेष प्रतिनिधी मंडळाची चर्चेची २४वी फेरी नवी दिल्ली इथं सुरु झाली. या बैठकीत सीमा भागातली परिस्थिती, व्यापार आणि दोन्ही देशांमधली विमान सेवा पुन्हा सुरू करण्याच्या शक्यतेसह विविध मुद्द्यांवर चर्चा होईल, अशी अपेक्षा असल्याचं संबंधित अधिकाऱ्यांनी सांगितलं.

चीनचे परराष्ट्र मंत्री वांग यी यांनी काल परराष्ट्र मंत्री डॉ. एस जयशंकर यांची भेट घेतली. परस्परांबरोबरच्या द्विपक्षीय संबंधांना सकारात्मक गती देण्यासाठी दोन्ही बाजूंनी सीमा भागात शांतता आणि स्थैर्य प्रस्थापित करण्याचा प्रयत्न

व्हायला हवा, तसंच लष्कर तैनाती कमी करण्याची प्रक्रियाही सुरु राहायला हवी, असं डॉ. जयशंकर यांनी यावेळी स्पष्ट केलं.

**<><><><><>**

गाझा मधल्या युद्धबंदीच्या नवीन प्रस्तावाला हमासनं स्वीकृती दिली आहे. गाझा शहरावरच्या इस्रायलच्या नियोजित हल्ल्यापूर्वी कतार आणि इजिप्तमधल्या आंतरराष्ट्रीय मध्यस्थांनी हा संघर्ष थांबवण्यासाठी जोरदार प्रयत्न सुरु केले होते. या पार्श्वभूमीवर मध्यस्थांनी मांडलेल्या प्रस्तावाला आपण सहमती दिल्याचं हमासनं जारी केलेल्या निवेदनात म्हटलं आहे.

या प्रस्तावानुसार, हमास १० इस्रायली ओलीसांची सुटका करेल, तसंच मृत्युमुखी पडलेल्या १८ इस्रायली नागरिकांचे मृतदेह इस्रायलच्या ताब्यात देईल. तर त्या बदल्यात, इस्रायल जन्मठेपेची शिक्षा भोगत असलेले १४० पॅलेस्टिनी कैदी, १५ वर्षांपेक्षा जास्त शिक्षा झालेले ६० नागरिक आणि इस्राएलच्या ताब्यात असलेल्या सर्व पॅलेस्टिनी महिला आणि अल्पवयीन मुलांची सुटका करेल.

दरम्यान, पॅलेस्टिनी नागरिकांच्या यातना आणि या प्रदेशातला विध्वंस लवकरच संपेल, अशी आशा हमास या संघटनेचे अधिकारी बसेम नैम यांनी व्यक्त केली आहे.

**<><><><><>**

देशाच्या विविध भागात मुसळधार पावसामुळे जनजीवन प्रभावित झालं आहे. अनेक ठिकाणी नद्यांना पूर आले आहेत.

दिल्लीमध्ये यमुना नदीनं धोक्याची पातळी ओलांडली असून, आज सकाळी ११ वाजता नदीची पाणी पातळी २०५ मीटर ७८ सेंटीमीटरवर पोहोचली. हथिनीकुंड बॅरेजमधून पाण्याचा विसर्ग झाल्यामुळे पाण्याच्या पातळीत वाढ झाल्याचं अधिकृत सूत्रांनी सांगितलं.

महाराष्ट्रात राजधानी मुंबईसह सर्वत्र मुसळधार पाऊस पडत असून ठिकठिकाणी जलाशयांच्या पाणी पातळीत वाढ होत आहे. मुंबईत मिठी नदीची पाणी पातळी वाढली असून समुद्रात उंच लाटा उसळत आहेत. मुंबई शहरात पावसामुळे भिंत कोसळून एकाचा मृत्यू झाला तर ३ जण जखमी झाले. अधिक माहिती आमच्या वार्ताहराकडून ....

**होल्ड - व्हॉईस कास्ट- अंकिता आपटे (१.१९ सेकंद)**

महाराष्ट्रात इतरत्रही नद्या दुथडी भरून वाहत असून अनेक ठिकाणी महामार्गांवरची वाहतूक ठप्प झाली आहे. अनेक जिल्ह्यांमधे प्रशासनानं शाळा महाविद्यालयांना सुट्टी दिली आहे. सखल भागात पाणी शिरल्यानं जनजीवन विस्कळीत झालं आहे. हिमाचल प्रदेशात कुल्लू इथं ढगफुटी झाली असून मंडी आणि सिमल्यात जागोजाग दरडी कोसळल्यानं रस्ते बंद झाले आहेत. अनेक ठिकाणी शेतीचं नुकसान झालं. जम्मू काश्मीरमधे जम्मू श्रीनगर राष्ट्रीय महामार्ग आज काही प्रमाणात वाहतुकीसाठी खुला झाला. कर्नाटकच्या अनेक भागातही जोरदार पावसाने हजेरी लावली आहे.

**<><><><><>**

ज्येष्ठ अभिनेता अच्युत पोतदार यांचं काल रात्री ठाण्यातल्या ज्युपिटर रुग्णालयात निधन झालं. ते ९१ वर्षांचे होते.

मध्यप्रदेशातल्या मराठी भाषक कुटुंबात जन्मलेले पोतदार यांचं बालपण आणि शिक्षण इंदूरमधे गेलं. रेवा इथल्या महाविद्यालयात प्राध्यापक म्हणून काम केल्यानंतर ते लष्करात भरती झाले, आणि कॅप्टन म्हणून १९६७ मधे निवृत्त झाले. नंतर इंडियन ऑईलमधे नोकरीत असताना त्यांनी

अभिनयाचा छंद जोपासला. नंतर मराठी रंगभूमी, दूरचित्रवाहिनी मालिका, आणि चित्रपटांमधे विविध चरित्र भूमिकांमधे त्यांनी ठसा उमटवला. १९८० मधे आक्रोश आणि अल्बर्ट पिंटो को गुस्सा क्यों आता है या गाजलेल्या चित्रपटात त्यांनी काम केलं आणि नंतर अर्धसत्य, नासूर, तेजाब, प्रहार,वंश, चमत्कार, रंगीला,

अग्निसाक्षी, तीसरी आंख, परिणीता अशा तब्बल सव्वाशे चित्रपटांमधे त्यांनी काम केलं. थ्री इडीयट्स चित्रपटातला " कहना क्या चाहते हो ?"हा त्यांचा संवाद तुफान लोकप्रिय ठरला. त्याखेरीज ९५ दूरचित्रवाहिनी मालिका, २६ नाटकं त्यांच्या नावावर जमा आहेत.

त्यांच्या पार्थिवावर आज संध्याकाळी ठाण्यात अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत.

**//<><><><><>//**